• वर्ष : ०३ • अंक : २३७ • पुणे • मंगळवार, दि. १९ मे २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक



# खासगी शिकवणीवर कायदा कधी?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वैद्यकीय पदवी प्रवेशासाठीच्या राष्ट्रीय पात्रता तथा प्रवेश परीक्षेतील (नीट) पेपरफुटी प्रकरणात उघड होत असलेल्या बड्या खासगी शिकवणी वर्गांच्या सहभागामुळे शिकवणी वर्गांवर नियंत्रण आणणारा कायदा कधी लागू होणार, असा प्रश्न विचारला जात आहे.

विनोद तावडे राज्याचे शिक्षणमंत्री असताना खासगी शिकवणी वर्गांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदा तयार करण्यासाठी हालचाली झाल्या होत्या. मात्र, तो कायदा प्रत्यक्षात येऊ शकला नाही. त्यानंतरही शिक्षण विभागाने शिकवणी वर्गांवर नियंत्रण ठेवण्यासाठीच्या कायद्याचा मसुदा तयार केला. मात्र, या कायद्याला मंजुरी कधी मिळणार, हा प्रश्न सुटलेला नाही.

खासगी शिकवणी वर्गांवर नियंत्रणासाठीच्या मार्गदर्शक सूचना केंद्र सरकारने गेल्या वर्षी जाहीर केल्या. मात्र, त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येते. राज्य मंडळाच्या नियमानुसार दहावी, बारावीच्या परीक्षा देण्यासाठी विद्यार्थ्यांची वर्गात किमान ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य असते. खासगी शिकवणी वर्गांच्या इंटिग्रेटेड, टाय-अप पद्धतींमुळे विद्यार्थी वर्गात बसतच नाहीत. त्यामुळे या नियमाची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालयात बायोमेट्रिक उपस्थिती सक्तीची करण्याची मागणी करण्यात येऊ लागली आहे. विशेष म्हणजे नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणातही शिकवणी वर्गांची संस्कृती माध्यमिक शिक्षणाच्या स्तरावर मोठे नुकसान करत असल्याचे म्हटले आहे. इयत्ता दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षा सुरू राहणार आहेत. मात्र, विद्यार्थ्यांना खासगी शिकवणी वर्ग लावण्याची गरज भासणार नाही, अशी सुधारणा त्यात करण्यात येईल, असे त्यामध्ये नमूद करण्यात आले आहे. गेल्या काही वर्षांत काही खासगी शिकवणी वर्गांनी स्वत:ची कनिष्ठ महाविद्यालये सुरू केली. काहींनी फारसे प्रवेश न होणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांशी संधान साधून विद्यार्थ्याचा प्रवेश तेथे दाखवून उपस्थिती लावायची आणि प्रत्यक्षात शिकवणी वर्गातच शिकवायचे, असा पायंडा पाडला. गेल्या वर्षी आणि या वर्षी अशा काही महाविद्यालयांना अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेतून काढून टाकण्यात आले. पण, पुरता नायनाट झालेला नाही. अशा प्रकारच्या आणखी महाविद्यालयांचा शोध सुरू असून, त्याबाबत अधिकाऱ्यांना तपास करण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती शिक्षण विभागातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी दिली.



> इंटिग्रेटेड, टायअप प्रकारच्या शिकवणी वर्गांवर राज्यात पूर्णपणे बंदी घातली पाहिजे. विद्यार्थ्यांची कनिष्ठ महाविद्यालयातील उपस्थिती अनिवार्य असली पाहिजे. त्यासाठी बायोमेट्रिक पद्धतीने उपस्थिती नोंदवणे अत्यावश्यक आहे. उपस्थितीच्या नियमाची कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे. तसेच नीट, जेईई अशा परीक्षांसाठी महाविद्यालयातच अधिकचे मार्गदर्शन मिळाल्यास ते चांगले होईल.
>
> – बंडोपंत भुयार, प्रवक्ते व राज्य उपाध्यक्ष, कोचिंग क्लासेस शिखर संघटना, महाराष्ट्र राज्य

> खासगी शिकवणी वर्गांवर नियंत्रण आणण्यासाठी बायोमेट्रिक पद्धतीने विद्यार्थ्यांची हजेरी नोंदविली जाण्याच्या दृष्टीने राज्य शासन गांभीर्याने पावले टाकत आहे. तसेच, महाविद्यालयांमध्ये सीसीटीव्हीही बसविण्यात येत आहेत.
>
> **– सचिंद्र प्रताप सिंह, शिक्षण आयुक्त**




## पतीचा गळा दाबून खून; गोठ्यातील पाईपला लटकवले

**सावरगाव (दै. आरंभ पर्व)**

जुन्नर तालुक्यातील निमगाव तर्फे म्हाळुंगे येथे एका विवाहित महिलेचा गळा दाबून खून करून तो आत्महत्येच्या बनावाचे स्वरूप दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली असून, जुन्नर पोलिसांनी पतीविरुद्ध खुनाचा गंभीर गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, पुढील तपास सुरू आहे. जुन्नर पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या फिर्यादीनुसार, रूपाली नवनाथ पारखे (वय ३५, रा. निमगाव तर्फे म्हाळुंगे, ता. जुन्नर, जि. पुणे) यांचा संशयास्पद मृत्यू शुक्रवारी (दि. १६) दुपारी सुमारे १:३० वाजण्याच्या सुमारास घडला. या घटनेप्रकरणी मयत महिलेचे भाऊ विकास वसंत पवार (रा. बल्लाळवाडी) यांनी जुन्नर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, रूपाली पारखे यांचे पती नवनाथ बाजीराव पारखे (वय ४३, रा. निमगाव तर्फे म्हाळुंगे) यांनी पत्नीला शेतातील गोठ्यात नेले. त्यानंतर तिचा दोन्ही हातांनी गळा दाबून खून केला. खून केल्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने आरोपीने तिच्या गळ्याला दोरी बांधून गोठ्यातील लोखंडी पाईपला लटकविले आणि तिने गळफास लावून आत्महत्या केल्याचा बनाव करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या घटनेची माहिती समोर आल्यानंतर निमगावात एकच खळबळ उडाली. परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली होती. घटनेची माहिती मिळताच जुन्नर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. तसेच मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. याप्रकरणी जुन्नर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत झालेल्या वादातून ही घटना घडली असण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे. फिर्याद नोंदविण्याची प्रक्रिया सहायक पोलिस निरीक्षक मोरे यांनी पूर्ण केली असून, पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक गटकूळ करीत आहेत.








### जामीन दिल्यास तो साक्षीदारांवर दबाव आणू शकतो

## ऋषिकेश वैद्यचा जामीन अर्ज फेटाळला



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देवी शक्तीचा संचार असल्याची बतावणी करत लैंगिक अत्याचार केलेल्या भोंदू ऋषिकेश वैद्यचा जामीन अर्ज अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी.पी. रागीट यांनी फेटाळला. या प्रकरणातील गांभीर्य, तथ्य व परिस्थिती लक्षात घेता जामीन फेटाळल्याचे आदेशात म्हटले आहे. न्यायालयीन कोठडीत असताना वैद्य याने जामिनासाठी अर्ज केला. या अर्जास सरकारी वकील ॲड. लीना पाठक, फिर्यादीचे वकील ॲड. रोहन नहार यांनी विरोध केला. ॲड. नहार यांना ॲड. ओंकार फडतरे, ॲड. गायत्री पोटवडे आणि ॲड. चैतन्य अभंग यांनी सहकार्य केले. हा गुन्ह गंभीर स्वरूपाचा आहे. वैद्य याने धार्मिक गुरू म्हणून असलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेत पीडितेवर बलात्कार केला आहे. या प्रकरणाचा तपास सुरू आहे. अद्याप दोषारोपपत्र दाखल झालेले नाही. त्यामुळे आरोपीला जामीन दिल्यास तो साक्षीदारांवर दबाव आणू शकतो, अशी भीती तपास अधिकारी आणि फिर्यादी यांनी व्यक्त केली. त्यामुळे त्याचा जामीन फेटाळण्याची मागणी करण्यात आली. गुन्ह्यांचे गांभीर्य आणि या प्रकरणातील तथ्ये व परिस्थिती विचारात घेता, असे निष्पन्न होते की, अर्जदार जामीन मिळण्यासाठी आवश्यक असलेला 'वरकरणी' आधार सिद्ध करण्यात अपयशी ठरला आहे आणि तो जामीन मिळण्यास पात्र नाही असे सांगत न्यायालयाने आरोपीचा जामीन फेटाळला. ही घटना डिसेंबर २०२३ ते ११ मे २०२५ या कालावधीत घडली. २७ मार्च २०२६ मध्ये हडपसर पोलिसात याबाबत गुन्हा दाखल झाला होता. त्यानुसार पोलिसांनी २८ मार्च रोजी त्याला अटक केली. सुरूवातीला पोलीस कोठडी, त्यानंतर तो आता न्यायालयीन कोठडीत आहे.






## थोडक्यात पण महत्वाचे



### आमदार शेखर निकम यांच्या शुभहस्ते सभागृह उद्घाटन सोहळा संपन्न

> “विकासाच्या वचनपूर्तीची दिशा स्पष्ट आहे, आणि ती दिशा समाजहितासाठी सदैव प्राधान्याने राहील : आमदार शेखर निकम

चिपळूण (आरंभ पर्व) : शिरगाव धनगरवाडी येथील सभागृहाचे उद्घाटन आमदार शेखर निकम यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. आपल्या निरपेक्ष सेवा कार्यातून आमदार शेखर निकम यांनी दिलेल्या शब्दाची पूर्तता करत, धनगर समाजासाठी प्रेरणादायी कार्य केले. उद्घाटन प्रसंगी आमदार शेखर निकम यांनी "समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सदैव तत्पर आहोत. धनगर समाजाच्या प्रगतीसाठी भविष्यातही आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील"असे आश्वासन दिले. कार्यक्रमात सभापती सूर्यकांत खेतले, जिल्हा परिषद सदस्य नेहा रहाटे, जागृति शिंदे, बाबू साळवी, सरपंच नीता शिंदे, बंटी कोळगे, अनिल शिंदे, भाई शिंदे, संजय कदम, रुची भागडे, उमेश चिपळूणकर, नागेश सोलकर ल, बाळू शिंदे, लक्ष्मण येडगे, प्रभाकर मोरे, अशोक भागडे, यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. संपूर्ण परिसरात या सभागृहाच्या उद्घाटनाने आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. धनगर समाजाच्या संस्कृतीला अभिमानाने जपणाऱ्या या सभागृहाचे लोकार्पण स्थानिकांसाठी एक अभिमानास्पद क्षण ठरला.



### रस्ता चुकलेल्या आजोबांना कुटुंबीयांपर्यंत पोहोचवण्यात यश

पुणे (आरंभ पर्व) : म्हात्रे पूल परिसरात रस्ता चुकलेल्या अवस्थेत आढळून आलेले दत्तू रामचंद्र जाधव यांना सुरक्षितपणे त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले. ही उल्लेखनीय कामगिरी शिवाभाऊ पासलकर आणि महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुप यांच्या टीमने केली. माहिती मिळताच जनसेवक शिवाभाऊ पासलकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आजोबांना सुरक्षितपणे अलंकार पोलीस स्टेशन येथे आणले. त्यानंतर पोलिसांच्या मदतीने त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेऊन आजोबांना सुखरूप कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले. या वेळी आजोबांच्या चेहऱ्यावर दिसलेला आनंद आणि कुटुंबीयांनी व्यक्त केलेली कृतज्ञता भावनिक वातावरण निर्माण करणारी ठरली. समाजातील बेपत्ता व्यक्तींना त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुप सातत्याने कार्यरत असून त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या कार्यात विशेष सहकार्य करणारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उल्हास कदम स, PSI दीक्षित स, PSI जाधव , पोलीस अधिकारी रायकर तसेच अलंकार पोलीस स्टेशन येथील सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

### एपीएस अंजना कृष्णा यांच्या कारवाईचे नागेश चव्हाण यांनी मानले आभार



बार्शी (आरंभ पर्व) : बार्शी शहर व तालुक्यात अवैध व्यवसायांवर सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे अवैध दारू विक्री, मटका, जुगार आदी व्यवसायांना मोठा आळा बसत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस नागेश चव्हाण यांनी सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी अंजना कृष्णा मॅडम यांचे विशेष आभार मानले आहेत. हत्तीज, ज्योतिबाची वाडी, अंबाबाईची वाडी तसेच वैराग परिसरामध्ये सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीविरोधात नागेश चव्हाण यांनी सातत्याने आवाज उठवला होता. परिसरातील नागरिकांच्या तक्रारी प्रशासनापर्यंत पोहोचवत त्यांनी कठोर कारवाईची मागणी केली होती. दरम्यान, जिल्हा पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांनी संबंधित कारवाईसाठी एक महिन्याची मुदत दिली होती. मात्र त्यापूर्वीच वैराग भागातील अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणात बंद झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, नागेश चव्हाण यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना पोलीस प्रशासन व अंजना कृष्णा मॅडम यांचे आभार मानले आहेत. तसेच, भविष्यात पुन्हा अवैध दारू विक्री सुरू झाल्यास ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही नागेश चव्हाण यांनी दिला आहे.

### अनैतिक संबंधाच्या संशयावरून पतीचा खून; आरोपी पतीस अटक

जुन्नर (आरंभ पर्व) : पत्नीचे अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून तिचा गळा आवळून खून केल्याची घटना निमगाव तर्फे म्हाळुंगे ता.जुन्नर येथे घडली. याप्रकरणी पोलिसांनी नवनाथ बाजीराव पारखे यास पत्नीचा खुन केल्याच्या आरोपावरून भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम -१०३(१),२३८ नुसार गुन्हा दाखल केला असुन आरोपीस अटक करण्यात आली आहे अशी माहिती पोलीस निरीक्षक किरण अवचर यांनी दिली. ही घटना दिं.१६ मे रोजी दुपारी १.३० वा. सुमारास निमगाव तर्फे म्हाळुंगे येथे घडली आहे. याबाबतची फिर्याद मृत रूपालीचा भाऊ विकास वसंत पवार, रा.बल्लाळवाडी ता. जुन्नर याने दिली आहे. रूपाली नवनाथ पारखे(वय ३५) असे मृत पत्नीचे नाव आहे. पत्नीच्या अनैतिक संबंध असल्याचा संशयामुळे एक महिन्यापूर्वी आरोपी पतीने पत्नी रुपालीस मारहाण केली होती. त्यानंतर रुपाली बल्लाळवाडी येथे माहेरी गेली होती.त्यानंतर तिने घरी येऊन पतीकडे दागिने मागितले होते तेव्हा त्यांच्यात वाद झाला. नवनाथ याने पत्नी रुपाली हिला शेतातील गोठ्यात नेऊन तेथे तिचा दोन्ही हाताने गळा दाबुन तिला ठार केले. यानंतर पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने तिच्या गळ्याला दावे बांधुन गोठ्यातील लोखंडी पाईपाला लटकावुन दिले व तिने गळा गळफास घेतला असे भासवले असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील तसेच पोलीस निरीक्षक किरण अवचर यांनी भेट दिली.

# २५ परिचारिका व परिचारकांचा भव्य गौरव!

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी संघ आणि योगमाया प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम



**मुक्ताईनगर (दै. आरंभ पर्व)**

रुग्णसेवेलाच ईश्वरसेवा मानून अहोरात्र कष्ट करणाऱ्या परिचारिकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी मुक्ताईनगर येथे एका विशेष कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी संघ' व 'योगमाया प्रतिष्ठान, मुक्ताईनगर' यांच्या संयुक्त विद्यमानाने उपजिल्हा रुग्णालय येथे आरोग्य सेवेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल एकूण २५ परिचारिका आणि परिचारकांचा जाहीर सत्कार करण्यात आला. कोरोना काळापासून ते आजतागायत सामान्य नागरिकांच्या आरोग्याची अविरत काळजी घेणाऱ्या या आरोग्यदूतांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. "डॉक्टरांच्या उपचाराला परिचारिकांच्या मायेच्या आणि तत्परसेवेचीजोड मिळाल्याशिवाय रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकत नाही. परिचारिकांचे हे योगदान समाजासाठी अत्यंत मोलाचे आहे ," असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुक्ताईनगर तालुका संघचालक डॉ. मनोज महाजन यांनी आपल्या भाषणात केले. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मनोज महाजन सर उपस्थित होते. तसेच उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. योगेश राणे सर, श्रीमती आशाताई चिखलकर, आणि योगमाया प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्री. अश्विन सुरवाडे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन श्री. वृषभ जोशी यांनी केले. अतिशय उत्साही वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याला मुक्ताईनगर परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, नागरिक आणि वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिष्ठित मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

सन्मानित झालेल्या परिचारिकांनी या कौतुकास्पद उपक्रमाबद्दल दोन्ही संस्थांचे मनापासून आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. कुणाल कोळी, यश शिरतुरे, विशाल तेलंग यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी संघ आणि योगमाया प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## 'बिझनेस मल्टिप्लायर' क्रेडिट कार्ड लॉन्च

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

आयडीएफसी फर्स्ट बँकेने संस्थापक, उद्योजक आणि व्यवसाय मालकांसाठी एफडी-समर्थित बिझनेस मल्टिप्लायर मेटल क्रेडिट कार्ड सादर केले आहे. दैनंदिन व्यावसायिक गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेल्या या प्रीमियम मेटल कार्डवर व्यवसायाचे नाव आणि कार्डधारकाचे नाव दोन्ही प्रिंट केले जातात, जे त्याच्या व्यावसायिक वापराची पुष्टी करते. व्यावसायिक खर्चासाठी स्वतंत्र क्रेडिट मर्यादेसह, बिझनेस मल्टिप्लायर क्रेडिट कार्ड व्यावसायिक आणि वैयक्तिक खर्च वेगळे ठेवण्यास मदत करू शकते. हे कार्ड कार्यालयीन साहित्य खरेदी, डिजिटल मार्केटिंग खर्च, एसएएएस (SaaS) सबस्क्रिप्शन, व्यावसायिक प्रवास, उपकरणांची खरेदी, इन्व्हेंटरी प्रोक्योरमेंट, आंतरराष्ट्रीय विक्रेता पेमेंट्स तसेच कर्मचारी रिइम्बर्समेंट्स यांसारख्या विविध व्यावसायिक खर्चांसाठी वापरता येऊ शकते. फिक्स्ड डिपॉझिटशी संलग्न खात्रीशीर क्रेडिट लिमिट, महत्त्वाच्या व्यावसायिक खर्च श्रेणींवर आकर्षक रिवॉर्ड्स, खर्चाचे रिअल-टाइम ट्रॅकिंग आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारांवर शून्य फॉरेक्स मार्कअप यांसारख्या सुविधांसह हे कार्ड व्यवसायांना कॅश फ्लो अधिक कार्यक्षमतेने व्यवस्थापित करण्यास, खर्चांवर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवण्यास आणि कालांतराने मजबूत क्रेडिट प्रोफाइल तयार करण्यास मदत करते.

## ‘आईपण आणि ओळख – जिजाऊंच्या मार्गाने’ उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**शिवसृष्टी, आंबेगाव येथे 'चाय पे चर्चा' तर्फे मातृदिनाचे औचित्य साधून विशेष कार्यक्रमाचे आयोजन**

**आंबेगाव (दै. आरंभ पर्व)**

मातृदिनाचे औचित्य साधून 'चाय पे चर्चा' संस्थेच्या वतीने आंबेगाव येथील 'शिवसृष्टी' मध्ये “आईपण आणि ओळख – जिजाऊंच्या मार्गाने” या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांचा आत्मविश्वास, स्वतःशी असलेले नाते आणि आयुष्यातील विविध भूमिका यांवर प्रकाश टाकणाऱ्या या सोहळ्याला २०० हून अधिक महिलांनी आपली उपस्थिती दर्शविली. डॉ. प्रतिची पुंडे यांनी “जिजाऊ ते मी: माँ से मैं तक” या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रभावी मांडणीमुळे उपस्थित महिला मंत्रमुग्ध झाल्या.





आईपणाच्या भूमिकेत स्वतःची ओळख कशी जपावी, याचे मौलिक धडे त्यांनी याप्रसंगी दिले.

सोनु जोशी, प्रणोती भोसले, हेमा शेजाळ, पल्लवी चाकणकर, शुभा हिंगमिरे आणि स्वाती वैद्य यांच्या मातांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी सर्व मान्यवर मातांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमासाठी 'Shri Mahalaxmi Catering & Events' यांनी एक्सक्लुझिव्ह पार्टनर म्हणून सहकार्य केले.

'चाय पे चर्चा' ही संस्था महिला सक्षमीकरण, नेटवर्किंग आणि वैयक्तिक विकासासाठी कटिबद्ध असून, भविष्यातही असे प्रेरणादायी कार्यक्रम राबवणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. महिलांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत अशा कार्यक्रमांची गरज व्यक्त केली.

# अनिल अगावणे यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ संपन्न

## एच्. व्ही. देसाई महाविद्यालयातून वृत्तपत्र लेखक अनिल अगावणे सेवानिवृत्त

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरातील प्रसिद्ध ऐतिहासिक वास्तू शनिवारवाड्या समोरील दि पूना गुजराती केळवणी मंडळाचे, एच्. व्ही. देसाई महाविद्यालयातून गेली ४० वर्ष ग्रंथालय विभागात ग्रंथालय परिचर म्हणून कार्यरत असणारे तसेच आपली सेवा पार पाडताना सामाजिक बांधिलकीचा वारसा आपल्या पत्रकारितेतून जनतेचे प्रश्न मांडून शासन, प्रशासन दरबारी त्यांचे निरासन होण्यासाठी कटिबद्ध असणारे वृत्तपत्र लेखक म्हणून प्रसिद्ध असलेले श्री.अनिल बाळासाहेब अगावणे हे नुकतेच झाले



आहेत. त्यांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभासाठी कसबा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार हेमंत रासने, स्थानिक नगरसेवक ॲड. कुणाल टिळक, माजी प्राचार्य डॉ. अनिल कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र गुरव, शाहीर हेमंत मावळे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त श्री. दशरथ कांबळे, ॲड. नरहरी कुलकर्णी, गणेश नलावडे, पियुष शहा, उमेश शिंदे, शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे सुधाकर इंगळे, दीपक यादव, प्रदीप गडदे, प्रवीण सव्वाशेर, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर सहकारी व मित्रपरिवार, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होता. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ.प्रा. रश्मी ढोबळे यांनी केले होते. या प्रसंगी अनिल अगावणे यांनी महाविद्यालयातील ग्रंथालय विभागात काम करता-करता समाजात घडणाऱ्या घडामोडींचे अचूक निरीक्षण करून ते दैनिक वृत्तपत्रांच्या माध्यमातून मांडून तळागाळातील विविध प्रश्नांवर आवाज उठवला आहे. यातील अनेक प्रश्न शासन-प्रशासनाने सोडवले देखील आहेत. असे मत प्रत्येक वक्त्याने व्यक्त केले.

त्यांनी इथून पुढील आयुष्यात अजून गतिशील पद्धतीने समाजकार्याचा वसा पुढे चालू ठेवावा. तसेच त्यांनी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी अनेक मागण्या शासन-प्रशासनाकडून मान्य करण्यासाठी वेळोवेळी आवाजही उठवला आहे, असे मत माजी प्राचार्य डॉ. अनिल कुलकर्णी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र गुरव, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मांडले.

## नऱ्हेगावातील ज्येष्ठ नागरिक नामदेव कुटे यांचे निधन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हेगाव येथील ज्येष्ठ नागरिक कै. नामदेव रामभाऊ कुटे (वय १००) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी आज दि. १६ मे २०२६ (शनिवार) रोजी सकाळी ९ वाजता नऱ्हेगाव स्मशानभूमी येथे करण्यात आला. ते प्रभाकर नामदेव कुटे व सुरेश नामदेव कुटे यांचे वडील तसेच माजी उपसरपंच सतीश कुटे व भाजप प्रभागाध्यक्ष राजू कुटे यांचे आजोबा होते. कै. नामदेव कुटे यांनी गावातील अध्यात्मिक, सांप्रदायिक व सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेत मोलाचे योगदान दिले होते. गावातील एक चांगले, मनमिळावू व आदर्श नागरिक म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे व परतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने कुटे परिवारावर दुःखाची छाया पसरली आहे.



## ग्रामीण महाराष्ट्राला जागतिक व्यासपीठ देणारं भव्य प्रदर्शन

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

बीकेसी येथे सुरू असलेलं ‘महालक्ष्मी सरस २०२६’ यंदा आपल्या भव्य उभारणी, आधुनिक सादरीकरण आणि जागतिक दर्जाच्या संकल्पनेमुळे विशेष चर्चेत आलं आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत ‘उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान’च्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनाची संकल्पना आणि डिझाईननबाबत दीपाली डिझाईन्सचे सर्वेसर्वा विनय मित्तल यांनी माहिती दिली.

यंदाच्या प्रदर्शनात ४० मीटर x ७ मीटरची विशाल एलईडी ॲनामॉर्फिक स्क्रीन, आकर्षक लाईटिंग, वातानुकूलित फूड कोर्ट आणि ६० हून अधिक कंटेनर्सच्या माध्यमातून उभारलेला भव्य सेट हे प्रमुख आकर्षण ठरत आहेत. जवळपास १५ हजार किलो वजनाच्या कंटेनर्सचा वापर करून साकारलेला हा सेट ग्रामीण महिलांच्या उत्पादनांचा “लोकल टू ग्लोबल” प्रवास दर्शवतो. संपूर्ण उभारणीसाठी १ लाख १८ हजारांहून अधिक मनुष्यतास खर्च करण्यात



आले असून, महाराष्ट्रातील कलाकारांनी हजारो तास मेहनत घेत ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली आहे. विनय मित्तल यांनी सांगितले की, “यंदाचं महालक्ष्मी सरस हे केवळ प्रदर्शन नाही, तर ग्रामीण महाराष्ट्राच्या कर्तृत्वाचा उत्सव आहे. महिलांच्या हातातील कला, त्यांची मेहनत आणि ‘लखपती दीदी’ बनण्याचा प्रवास जागतिक स्तरावर पोहोचवण्याचा हा प्रयत्न आहे.”

# डॉ. केतन देशपांडे यांना ‘डॉ. बी.एम.एल. मुंजाल सोशल इम्पॅक्ट पुरस्कार’ प्रदान

**शिक्षण आणि कौशल्य विकासातील योगदानाची राष्ट्रीय स्तरावर दखल**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे, शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनासाठी झटणाऱ्या ‘फ्रेंड्स युनियन फॉर एनर्जायझिंग लाइव्हज’ (फ्युएल) या संस्थेचे संस्थापक आणि अध्यक्ष डॉ. केतन देशपांडे यांना मानाच्या 'डॉ. बी.एम.एल. मुंजाल सोशल इम्पॅक्ट पुरस्कार २०२६' ने नुकतेच सन्मानित करण्यात आले. नवी दिल्ली येथील ‘इंडिया हॅबिटॅट सेंटर’मध्ये आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात "शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेले उत्कृष्ट प्रयत्न" या श्रेणीत त्यांना हा गौरव प्रदान करण्यात आला.

हिरो ग्रुपचे संस्थापक डॉ. ब्रिजमोहन लाल मुंजाल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा हा पुरस्कार समुदाय विकास आणि तळागाळातील सामाजिक बदलांसाठी कार्यरत असलेल्या व्यक्तींना दिला जातो. रमण



कांत मुंजाल फाउंडेशन आणि हिरो फ्युचर एनर्जीज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या पुरस्कार सोहळ्याचे हे तिसरे वर्ष होते. या सोहळ्यात शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेल्या उत्कृष्ट प्रयत्न या श्रेणीत डॉ. केतन देशपांडे यांना डॉ. बी.एम.एल. मुंजाल सोशल इम्पॅक्ट पुरस्कार २०२६' ने सम्मानित करण्यात आले। स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र आणि 1 लाख रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरुप होते।

डॉ. केतन देशपांडे यांनी गेल्या १८ वर्षांपासून 'फ्युएल'च्या माध्यमातून वंचित आणि कुटुंबातील पहिल्या पिढीतील शिकणाऱ्या तरुणांसाठी मोलाचे कार्य केले आहे. भारतभरातील विविध राज्यांमध्ये प्रशिक्षण, शिष्यवृत्ती आणि करिअर मार्गदर्शनाद्वारे १० लाखांहून अधिक तरुणांपर्यंत त्यांनी आपली सेवा पोहोचवली आहे. या कार्याला कॅपजेमिनी, एसबीआय फाउंडेशन, एचडीएफसी बँक, सिप्लाचे अध्यक्ष डॉ. युसूफ हमीद यांसारख्या नामांकित संस्था आणि व्यक्तींचे पाठबळ लाभले आहे. संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत २.९ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना भविष्यातील कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात आले असून, २,९०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला आहे. या कार्याची दखल घेत डॉ. देशपांडे यांना यापूर्वी ‘चॅम्पियन्स ऑफ चेंज’ यासह अनेक पुरस्कारांनी

> हा सन्मान अशा प्रत्येक विद्यार्थ्याचा आहे ज्याने प्रतिकूल परिस्थितीत मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस केले. डॉ. बी.एम.एल. मुंजाल यांच्या वारशातून मिळणारी मूल्ये आम्हाला पुढील प्रवासासाठी प्रेरणा देत राहतील.
>
> **- डॉ. केतन देशपांडे, संस्थापक-अध्यक्ष, फ्युएल**

सन्मानित करण्यात आले आहे. ते अशोका फेलो देखील आहेत.

डॉ. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ‘फ्युएल’ने महाराष्ट्रात ‘फ्युएलस्किलटेक अँड आंत्रप्रेन्योरशिप युनिव्हर्सिटी’ची स्थापना केली आहे. राज्य शासनाने याला खाजगी कौशल्य विद्यापीठ म्हणून मान्यता दिली असून, येथे उद्योग अनुभवासोबत शैक्षणिक अभ्यासक्रम शिकवण्यावर भर दिला जातो.






दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

मंगळवार, दि. १९ मे २०२६










## थोडक्यात पण महत्वाचे



### व्यंगचित्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सर्जनशीलतेची प्रेरणा

पुणे (आरंभ पर्व) : व्यंगचित्रांचे गाव म्हणून ओळख असलेल्या गोऱ्हे बुद्रुक येथे आयोजित 'समर कॅम्प'मध्ये व्यंगचित्रकार धनराज गरड यांनी विद्यार्थ्यांसोबत व्यंगचित्र कलेची कार्यशाळा घेतली. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध विषयांवरील व्यंगचित्रे रेखाटून सकारात्मक प्रतिसाद दिला. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील व्यंगचित्र परंपरा, नामवंत व्यंगचित्रकार आणि व्यंगचित्रांचे सामाजिक महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी बोलताना धनराज गरड म्हणाले, "या गावातील मुलांमधून भविष्यात उत्तम व्यंगचित्रकार घडतील. गोऱ्हे बुद्रुक हे फक्त व्यंगचित्रांचे गाव न राहता व्यंगचित्रकारांचे गाव व्हावे, ही अपेक्षा आहे." श्री. रजनिकांत मेंढे सर यांच्या पुढाकारातून ग्रामस्थ, ग्रामपंचायत आणि विविध सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने सुरू असलेला हा समर कॅम्प यंदा पाचव्या वर्षात दाखल झाला आहे. पुस्तक वाचन, चित्रकला, नाट्य, एआय प्रशिक्षण, वक्तृत्व, धार्मिक स्थळांना भेट तसेच सकस आहार अशा विविध उपक्रमांमुळे जि.प.शाळा गोऱ्हे बुद्रुक ही आदर्श शाळा ठरत आहे. यावेळी दत्ता जोरकर शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ९६ वर्षांच्या इतिहासात प्रथमच एमबँकेची विक्रमी कामगिरी



• शून्य एनपीए, ₹७०० कोटींहून अधिक ठेवी; ₹११०० कोटींच्या व्यवसायाचा टप्पा पार

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्रातील विश्वासार्ह नागरी सहकारी बँकांपैकी एक असलेल्या एमबँक अर्थात द मुस्लिम सहकारी बँक लिमिटेड, पुणे यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आपल्या ९६ वर्षांच्या इतिहासातील सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली आहे. बँकेने यंदा प्रथमच ₹७०० कोटींहून अधिक ठेवींचा टप्पा पार करताना ₹११०० कोटींपेक्षा जास्त व्यवसाय केला असून शून्य एनपीए राखण्यातही यश मिळवले आहे. बँकेने दिलेल्या माहितीनुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये एमबँकेने ९६ वर्षांतील सर्वाधिक नफा नोंदवला असून मजबूत बॅलन्स शीट कायम राखली आहे. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, डिजिटल सेवांचा विस्तार आणि ग्राहकांना अधिक जलद व सुलभ बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्याच्या धोरणामुळे ही कामगिरी शक्य झाल्याचे सांगण्यात आले. एमबँकेचे अध्यक्ष तन्वीर इनामदार म्हणाले, "९६ वर्षांच्या प्रवासात ग्राहक, शेअरधारक, संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांनी आम्हाला दिलेला विश्वास अमूल्य आहे. त्यांच्या सहकार्यामुळेच आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आम्ही सर्वोत्तम कामगिरी करू शकलो. या यशासाठी मी सर्वांचा मनापासून ऋणी आहे." आज एमबँक एकाच कुटुंबातील अनेक पिढ्यांना सेवा देत असून ग्राहकांशी विश्वासाचे नाते निर्माण करण्यात बँकेला यश आले आहे. आधुनिक डिजिटल सुविधा आणि ग्राहककेंद्रित दृष्टिकोन यांच्या मदतीने परंपरा आणि आधुनिकतेचा समतोल राखण्यात बँकेने विशेष यश मिळवले आहे. १९३१ मध्ये स्थापन झालेली एमबँक ही पुणे मुख्यालय असलेली सहकारी बँक असून डिजिटल बँकिंग, कर्ज, ठेवी आणि विविध आर्थिक सेवा पुरविण्यावर तिचा भर आहे. व्यक्ती तसेच व्यवसायांसाठी सुलभ, तंत्रज्ञानाधारित आणि ग्राहकाभिमुख सेवा देण्याचे काम बँकेमार्फत केले जाते.

### राष्ट्रीय बंजारा महासंघाच्या पुणे शहराध्यक्षपदी संदीप जाधव



पुणे (आरंभ पर्व) : सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे संदीप जाधव यांची राष्ट्रीय बंजारा महासंघाच्या पुणे शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस अमोल भाऊ पवार यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. १६ मे २०२६ रोजी झालेल्या या निवडीमुळे बंजारा समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. लातूर जिल्ह्यातील उदगीर गावचे सुपुत्र असलेले संदीप जाधव हे पुणे शहरात विविध सामाजिक उपक्रमांद्वारे सक्रिय कार्य करत आहेत. ते युवा क्रांती फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र पुणे शहर संघटक, निर्भय युवा ग्रामीण पत्रकार संघ पुणे शहर सोशल मीडिया अध्यक्ष, शिवसेना अधिकृत जय महाराष्ट्र माथाडी आणि जनरल कामगार सेना पुरंदर-हवेली उपाध्यक्ष तसेच अजिंक्य महाराष्ट्र न्यूज चॅनल प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. सामाजिक क्षेत्रात तळागाळातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे, सर्वसामान्यांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आहोरात्र झटणारे कार्यकर्ते म्हणून संदीप जाधव यांची ओळख आहे. बंजारा समाजाबद्दलची त्यांची तळमळ, समाजसेवेची भावना आणि समाजहितासाठी केलेले कार्य लक्षात घेऊन राष्ट्रीय बंजारा महासंघाच्या वतीने त्यांच्यावर पुणे शहराध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.






# पुण्यात 'भारत की बेटी अवॉर्ड २०२६' उत्साहात संपन्न

## मातृदिनानिमित्त विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांचा गौरव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मीडिया वर्ल्ड तर्फे आयोजित 'भारत की बेटी अवॉर्ड २०२६' हा भव्य सन्मान सोहळा मातृदिनाच्या पार्श्वभूमीवर पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, घोले रोड, पुणे येथे उत्साहात संपन्न झाला. समाजात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, कलाकार, उद्योजक आणि नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून डॉ. नीलमताई गोऱ्हे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांमध्ये अंकिता पाटील ठाकरे तसेच यांचा समावेश होता. कार्यक्रमात प्रसिद्ध अभिनेते देव गिल, मिस अर्थ इंडिया 2025 कोमल चौधरी, अभिनेत्री केसरी तसेच अभिनेता प्रसाद शिखरे, संतोष जगताप, मारुती भंडारी, शशिकांत कांबळे, गीतसानिया कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती लाभली. महाराष्ट्रासह देशभरातील विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या महिलांना यावेळी सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन मीडिया वर्ल्ड चे संस्थापक सुमित अंबेकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. तसेच श्री प्रमोद गोळे, व व्यावसायिक मार्गदर्शक एस एस सावंत यांचे सहकार्य लाभले.

यावेळी बोलताना श्री. सुमित अंबेकर म्हणाले, "'भारत की बेटी अवॉर्ड २०२६' हा समाजात प्रेरणादायी कार्य करणाऱ्या महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्याचा प्रयत्न आहे. विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या कार्याची समाजाला प्रेरणा मिळावी हा या उपक्रमामागील उद्देश आहे." देशातील एक लाख महिलांना हा सन्मान मिळवून देण्याचा संकल्प देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. नीलमताई गोऱ्हे म्हणाल्या, "आज महिला शासन, शिक्षण, आरोग्य, उद्योग, समाजकारण आणि सार्वजनिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत आहेत. अशा महिलांचा गौरव केल्याने समाजात सकारात्मक प्रेरणा निर्माण होते."

'नारी शक्ती – राष्ट्र शक्ती' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमासाठी पुणे शहरात विविध सामाजिक माध्यमांद्वारे जनजागृती मोहीम, होर्डिंग्ज आणि प्रचार उपक्रम राबविण्यात आले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुनील धनगर आणि सौ. मयुरी येवले यांनी केले तर आभार इसे एस. एस. सावंत यांनी मानले.

# NEET पेपरफुटीच्या निषेधार्थ युवक काँग्रेसचे आंदोलन



**कराड (दै. आरंभ पर्व)**

NEET परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ सातारा जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने आज कराड येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ होत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी "२३ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य सरकार धोक्यात घालत आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी तडजोड करणाऱ्या या सरकारला धडा शिकवण्याचे काम युवक काँग्रेस करेल," असा इशारा दिला.

NEET परीक्षेतील कथित गैरप्रकारांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. या आंदोलनात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रथमेश आबणावे, प्रदेश सरचिटणीस व सातारा जिल्हा प्रभारी भुषण राणभरे, सातारा जिल्हाध्यक्ष राहुलराज पवार, प्रदेश सरचिटणीस अमित जाधव, प्रदेश सरचिटणीस विश्वजीत जाधव, जिल्हा उपाध्यक्ष समीर इनामदार, NSUI जिल्हाध्यक्ष मुबीन बागवान, तालुका अध्यक्ष देवदास माने, दक्षिण अध्यक्ष चैतन्य पाटील, उत्तर अध्यक्ष प्रवीण वेताळ, पाटण अध्यक्ष नरेंद्र पाटणकर, सोशल मीडिया अध्यक्ष दिग्विजय जमाले, दिग्विजय सूर्यवंशी आबा, राम मोहीते, अक्षय सुर्वे, मयुर पाटील, जिल्हा उपाध्यक्ष उदय जाधव, शानूर देसाई, तुषार लोंढे, अतुल थोरात, शाहरुख मुल्ला आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'द डिस्टिंग्विश्ड जेंटलमन्स राईड'चा स्नेहमेळावा संपन्न

## पुरुषांच्या आरोग्य जनजागृतीसाठी २८० रायडर्सचा सहभाग

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुरुषांच्या मानसिक आरोग्याबाबत जागृती निर्माण करणे तसेच प्रोस्टेट कॅन्सर संशोधनासाठी निधी संकलन करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला 'द डिस्टिंग्विश्ड जेंटलमन्स राईड' (DGR) स्नेहमेळावा नुकताच पुण्यात उत्साहात पार पडला. पाषाण येथील ट्रायम्प – बी.यू. भंडारी मोटारसायकल शोरूमपासून सुरू झालेल्या या काकर्यक्रमाचा समारोप कल्याणी नगर येथील 'कायरोस रेस्टॉरंट'मध्ये झाला.

जगभरात एकाच दिवशी आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमात पुण्यातील तब्बल २८० रायडर्स सहभागी झाले होते. क्लासिक आणि कस्टम मोटारसायकलींसह रायडर्सनी आकर्षक 'डॅपर' पेहरावात सहभाग नोंदवत शहरातील विविध भागांतून एकत्र येत सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. पुरुषांच्या आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करण्याबरोबरच जबाबदार आणि शिस्तबद्ध मोटरसायकलिंगचा संदेशही या राईडमधून देण्यात आला. 'द डिस्टिंग्विश्ड जेंटलमन्स राईड' या जागतिक उपक्रमाची सुरुवात



२०१२ मध्ये ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे मार्क हव्वा यांनी केली. 'Mad Men' मालिकेतील डॉन ड्रेपर या पात्रापासून प्रेरणा घेत ही संकल्पना साकारण्यात आली. आज हा उपक्रम ११५ देशांपर्यंत पोहोचला असून आतापर्यंत ३ लाख ४० हजारांहून अधिक रायडर्सनी सहभाग घेत ३.१६ कोटी अमेरिकी डॉलरहून अधिक निधी उभारला आहे. पुण्यातील कार्यक्रमाचे आयोजन 'डीजीआर २०२६ होस्ट आणि रेडॉन रायडर्सचे संस्थापक' डॉ. किशोर शिंदे, ट्रायम्प – बी.यू. भंडारीचे राजेश वर्मा तसेच डीजीआर २०२६ होस्ट व रेडॉन रायडर्स कोअर कमिटी सदस्य अॅड. नरेश शेळके यांनी केले. बजाज इंडियाच्या रितिका लहिरी यांनी मोटरसायकलिंग आणि डीजीआर संदर्भातील महत्त्वपूर्ण सूचना व माहिती दिल्यानंतर पाषाण येथून या कार्यक्रमाची सुरुवात झाली.

या कार्यक्रमाचे अधिकृत मीडिया पार्टनर रेड एफएम ९८.३ होते. रेड एफएमचे आरजे बंड्या यांनी उपस्थित राहून रायडर्सशी संवाद साधला. कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून सच्चिदानंद मेंटल हेल्थ अँड काउन्सलिंग सेंटरचे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. प्रसन्न फुटाणे आणि 'श्री बाईक पॉइंट'चे इंजिनिअर प्रसाद बापट उपस्थित होते. डॉ. प्रसन्न फुटाणे यांनी मानसिक आजार, नैराश्य, त्यामागील कारणे आणि उपचार याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच इंजिनिअर प्रसाद बापट यांनी उन्हाळा आणि पावसाळ्यात मोटारसायकलची काळजी, देखभाल आणि नियोजन यासंदर्भात उपयुक्त माहिती दिली. उन्हाळ्याच्या कडक उष्णतेतही सर्व २८० रायडर्सनी संपूर्ण कार्यक्रमात उत्कृष्ट शिस्त, सुरक्षितता आणि उत्साह कायम राखला.

दरवर्षी मे महिन्यातील रविवारी जगभरात एकाच दिवशी होणारा हा कार्यक्रम २०२६ मध्ये विशेषतः १७ मे रोजी आयोजित करण्यात आला. यंदा डी.जी. आर.ने आपल्या १५व्या वर्षात पदार्पण केले असून फॅशनेबल पेहराव, क्लासिक मोटारसायकली आणि पुरुषांच्या आरोग्यासाठीची एकजूट हाच या उपक्रमाचा खरा आत्मा ठरला.

# देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याविरोधात मंदिरे एकवटली !

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




महाराष्ट्राची सांस्कृतिक अस्मिता आणि कोट्यवधी हिंदूंचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायक देवस्थानांच्या शेकडो एकर जमीनीला धोका पोहोचवणारा 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६' कोणत्याही अटीशिवाय राज्य सरकारने तात्काळ मागे घ्यावा, अशी एकमुखी मागणी आज येथे आयोजित अष्टविनायक मंदिरांच्या विश्वस्तांनी संयुक्त पत्रकार परिषदेत केली. महसूल व वन विभागाने पुढे सरकवलेला हा मसुदा म्हणजे हिंदू मंदिरांची स्वायत्तता आणि त्यांच्या उत्पन्नाचे ऐतिहासिक स्रोत मुळापासून मोडीत काढण्याचे पद्धतशीर कारस्थान आहे. एका बाजूला अल्पसंख्याकांच्या संस्थांना कायदेशीर अभेद्य कवच द्यायचे आणि दुसऱ्या बाजूला हिंदूंच्या पवित्र मंदिरांची मालमत्ता व्यक्तींच्या खाजगी घशात घालायची, हा सरकारी दुजाभाव अष्टविनायक मंदिरे कदापि सहन करणार नाही, सर्व अष्टविनायक मंदिरांचा या प्रस्तावित कायद्याला तीव्र विरोध आहे, अशी स्पष्ट भूमिका 'चिंचवड देवस्थान ट्रस्ट'चे विश्वस्त श्री. केशव विद्वांस यांनी अष्टविनायक मंदिरांच्या संयुक्त पत्रकार परिषदेद्वारे मांडली. पुणे येथे झालेल्या पत्रकार परिषदेला अष्टविनायक मंदिरे समितीच्या वतीने श्री मयुरेश्वर (मोरगांव), श्री चिंतामणी (थेऊर), श्री सिद्धिविनायक (सिद्धटेक), श्री मोरया गोसावी संजीवन समाधी मंदिर आदीचे व्यवस्थापन पहाणारे चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त श्री. केशव विद्वांस, श्री बल्लाळेश्वर देवस्थान (पाली) ट्रस्टचे श्री. जितेंद्र गद्रे, उपाध्यक्ष श्री. वैभव आपटे, श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट ओझरचे अध्यक्ष श्री. बाळकृष्ण कवडे, श्री गणपती देवस्थान महडचे विश्वस्त श्री. किरण काशीकर आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट हे उपस्थित होते. राज्यातील सर्वच देवस्थानांना ग्रासणाऱ्या या संभाव्य संकटामुळे आता महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि धार्मिक वैभव असलेली पवित्र अष्टविनायक मंदिरेही या विरोधात पुढे आली असून त्यांनी या कायद्याला कडाडून विरोध दर्शवला आहे. चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त श्री. केशव विद्वांस म्हणाले की , छत्रपती शिवाजी महाराज, पेशवे आणि ऐतिहासिक राजघराण्यांनी मोरगाव, सिद्धटेक, पाली, महाड, थेऊर, लेण्याद्री, ओझर आणि रांजणगाव या अष्टविनायकांच्या मंदिरांमध्ये त्रिकाळ पूजा-अर्चा, महाप्रसाद, अखंड अन्नछत्र, नैवेद्य आणि वार्षिक उत्सव अविरत चालण्यासाठी शेकडो एकर जमिनी 'इनाम' म्हणून दिल्या आहेत. कायदेशीर नियमांनुसार मंदिराची 'मूर्ती' हीच एक 'कायदेशीर व्यक्ती' असून या जमिनींची एकमेव मालक आहे; परंतु या प्रस्तावित कायद्याच्या कलम ३ आणि ४ मुळे एका झटक्यात ही ऐतिहासिक इनामे रद्द होऊन, देवतेच्या जमिनी वहिवाटदार, मिरासदार किंवा पुजारी यांच्या नावे खाजगी मालमत्ता म्हणून वर्ग केल्या जातील.

## थोडक्यात पण महत्वाचे



### हॉटेल उद्योगात मनुष्यबळाची कमतरता

पिंपरी-चिंचवड (आरंभ पर्व) : भारतातील हॉस्पिटॅलिटी (आतिथ्य) क्षेत्र झपाट्याने विस्तारत असताना, हॉटेल उद्योगाला प्रवेश-स्तरीय प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी कमतरता जाणवत आहे. भरतीतील तूट, उच्च ॲट्रिशन (कामगार गळती) आणि तात्काळ कामासाठी तयार उमेदवारांची गरज लक्षात घेता, 'डायरेक्ट प्लेसमेंट' आधारित हॉस्पिटॅलिटी व्होकेशनल डिप्लोमा पाथवे हा प्रभावी आणि व्यावहारिक पर्याय म्हणून पुढे येत आहे. हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात केवळ व्यवस्थापक किंवा वरिष्ठ तज्ज्ञांचीच नव्हे, तर शिस्तबद्ध, सेवा-केंद्रित आणि ऑपरेशन्सशी पटकन जुळवून घेणाऱ्या प्रवेश-स्तरीय कर्मचाऱ्यांची मोठी गरज असते. विविध बाजारपेठांमध्ये कुशल-अकुशल श्रेणीत 30 ते 40 टक्क्यांपर्यंत मनुष्यबळाची कमतरता जाणवत असल्याने उद्योग असंघटित भरतीऐवजी संरचित वर्कफोर्स पाइपलाइनकडे वेगाने वळत आहे. पारंपरिक "प्रथम प्रशिक्षण, नंतर नोकरी" या पद्धतीऐवजी, या मॉडेलमध्ये उमेदवारांना सुरुवातीपासूनच प्रत्यक्ष हॉटेलमध्ये कामाची संधी मिळते. उमेदवार थेट नोकरीला सुरुवात करतात आणि त्याचवेळी ग्रूमिंग, वर्कप्लेस रेडीनेस (कामाच्या ठिकाणी तयारी) तसेच संरचित व्होकेशनल डिप्लोमा फ्रेमवर्क अंतर्गत टप्प्याटप्प्याने प्रगती करतात. त्यामुळे उद्योगाला तात्काळ उपयुक्त कर्मचारी मिळतात आणि उमेदवारांना प्रत्यक्ष अनुभवासह करिअरची मजबूत दिशा मिळते. या पाथवे कार्यक्रमात उमेदवारांची ओळख व ऑनबोर्डिंगनंतर संवाद कौशल्य, व्यावसायिक शिस्त, सेवा-दृष्टिकोन, ग्रूमिंग मानके, हॉस्पिटॅलिटी वर्तनशैली यावर विशेष भर दिला जातो. त्यानंतर उमेदवारांना प्रत्यक्ष हॉटेल भूमिकांमध्ये प्लेसमेंट दिले जाते, ज्यामुळे त्यांना वास्तविक ऑपरेशनल अनुभव मिळून आवश्यक कौशल्ये आणि व्यावसायिक सवयी प्रत्यक्ष कामातून विकसित होतात. अधिक माहितीसाठी या नंबरवर कॉल / व्हाट्स ॲप 9769559855 / 9769761099 संपर्क साधावा.

### अमनोराचा शंभर टक्के निकाल



पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील अमनोरा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाने यंदा शंभर टक्के निकालाची नोंद केली असून विज्ञान, वाणिज्य आणि मानवविद्या शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. विज्ञान शाखेत अभिनंदन जिनेंद्र पाटील यांनी ९०.६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेत आस्था महाजन हिने ९६.६ टक्के गुणांसह अव्वल स्थान पटकावले, तर मानवविद्या शाखेत तेजस्वी खानवॉकर हिने ९६.६ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश मिळवले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा असल्याचे विद्यालय प्रशासनाने सांगितले. शैक्षणिक गुणवत्ता आणि सर्वांगीण विकास यांचा समतोल साधत विद्यार्थ्यांना सक्षम घडविण्याचे कार्य विद्यालय सातत्याने करत असल्याचेही प्रशासनाने नमूद केले. विद्यालयाच्या संचालिका मीरा नायर म्हणाल्या, "बारावी मंडळ परीक्षेत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाचा आम्हाला अत्यंत अभिमान आहे विद्यार्थ्यांनी समर्पण, शिस्त आणि गुणवत्तेचे उत्कृष्ट उदाहरण सादर केले आहे. शंभर टक्के निकालासह अव्वल विद्यार्थ्यांनी ९६.६ टक्के गुण मिळवले आहेत. हे यश विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या संयुक्त प्रयत्नांचे फलित आहे." विद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### संतूर लाईमची नवीन टीव्ही जाहिरात लॉंच




बेंगळुरू (आरंभ पर्व) : विप्रो कंझ्युमर केअर अँड लाइटिंगचा प्रमुख ब्रँड असलेल्या संतूरने संतूर लाइम साबणासाठी नवीन टीव्ही जाहिरात लॉंच केली आहे. ही जाहिरात आजच्या व्यस्त दिनचर्येत दररोज स्वतःला पुन्हा ताजेतवाने आणि रिचार्ज करण्याच्या कल्पनेवर आधारित आहे. "3x फ्रेशनेस" या आश्वासनासह हा साबण प्रत्येक वापरानंतर दीर्घकाळ ताजेपणाची अनुभूती देतो. संतूर लाइम साबणामध्ये लिंबू, एलोवेरा आणि मेंथॉल यांचे मिश्रण आहे, ज्यामुळे थंडावा देणारा आणि ताजेतवाना करणारा आंघोळीचा अनुभव मिळतो. टिल्ट ब्रँड सोल्युशन्सने संकल्पित केलेली ही टीव्ही जाहिरात एका शिक्षिकेची कथा दाखवते, जी एक आईसुद्धा आहे. ती शाळा आणि घर या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळते. दिवसभराच्या धावपळीत ती थकलेली दिसते, तिच्यावरचा ताण जाणवू लागतो, पण थोडी विश्रांती मिळाल्यानंतर तिचा मूड बदलतो. त्यानंतर संतूर लाइम साबणाने आंघोळ केल्यानंतर ती पूर्णपणे "100% रिचार्ज" झाल्यासारखी ताजेतवानी होते आणि पुन्हा उत्साहाने आपले काम पुढे सुरू करते. या मोहिमेबद्दल बोलताना, एस. प्रसन्ना राय, चीफ मार्केटिंग ऑफिसर, विप्रो कन्झ्युमर केअर म्हणाले, "लिंबू, एलोवेरा आणि मेंथॉल या तीन घटकांचे फायदे एकत्र करून आम्ही साबणाचा फ्रेशनेस अनुभव अधिक चांगला आणि ताजेतवाना केला आहे. यामुळे आंघोळ केल्यानंतर शरीराला अधिक ताजेतवाने वाटते. ही मोहीम थकलेल्या अवस्थेतून पुन्हा उत्साहाने दिवसाला सामोरे जाण्याचा नैसर्गिक अनुभव दाखवते.

### HP India : नवीन उत्पादने आणि सोल्यूशन्सचे अनावरण



नवी दिल्ली (आरंभ पर्व) : भारतातील तंत्रज्ञान क्षेत्राला नवी दिशा देत HP India ने २० हून अधिक नवीन उत्पादने आणि सोल्यूशन्सचे अनावरण केले आहे. गुरुग्राम येथे आयोजित कार्यक्रमात कंपनीने वैयक्तिक संगणन, प्रिंटिंग आणि कर्मचारी-केंद्रित एआय सोल्यूशन्सचा व्यापक पोर्टफोलिओ सादर केला. विद्यार्थी, व्यावसायिक, लघुउद्योग आणि उद्योग क्षेत्रातील बदलत्या गरजांना लक्षात घेऊन ही उत्पादने विकसित करण्यात आली आहेत.

# बीएसएचने नवीन श्रेणी केली लॉंच

- ७ किलो ते १२ किलो क्षमतेमध्ये उपलब्ध; नवीन श्रेणीमध्ये स्मार्ट वैशिष्ट्ये आणि सुलभतेसाठी 'नेक्स्ट-जेन युजर इंटरफेस'चा समावेश
- २०२६ पर्यंत टॉप लोड वाशिंग मशीन व्हॉल्यूम तिप्पट करण्याचे आणि मार्केट शेअर दुप्पट करण्याचे बीएसएच चे उद्दिष्ट




**पुणे (दै. आरंभ पर्व)**


होम अप्लायन्सेस उद्योगातील जागतिक आघाडीची कंपनी बीएसएच हाऊसगेरेट जीएमबीएच ची उपकंपनी असलेल्या बीएसएच होम अप्लायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड'ने आपल्या टॉप लोड वाशिंग मशीन विभागातील वाढीला गती देण्यासाठी नवीन श्रेणी लॉंच केली आहे. कंपनीने ७ किलो ते १२ किलो क्षमतेच्या बॉश टॉप लोड वाशिंग मशीन वॉशिंग मशीन्ससह आपल्या पोर्टफोलिओचा विस्तार केला आहे. हा लॉन्च भारतातील सर्वात मोठ्या आणि वेगाने वाढणाऱ्या लॉन्ड्री विभागांपैकी एक असलेल्या टॉप लोड वॉशिंग मशीन सेगमेंटमध्ये बॉशच्या धोरणात्मक विस्ताराचे प्रतीक आहे. किफायतशीर ते प्रीमियम किंमत श्रेणीपर्यंत पसरलेल्या नव्या ऑटोमॅटिक टॉप लोड पोर्टफोलिओद्वारे, बॉश चे उद्दिष्ट या श्रेणीचा स्वीकार अधिक वेगाने वाढवणे तसेच उच्च-वॉल्यूम टॉप लोड वाशिंग मशीन बाजारातील आपली उपस्थिती अधिक मजबूत करणे आहे.

उद्योग अहवालांनुसार, सोयीसुविधा, प्रीमियम अनुभव आणि स्मार्ट फीचर्सकडे वाढता कल टॉप लोड वाशिंग मशीनच्या स्वीकाराला वेग देत आहे. अधिक सक्षम पोर्टफोलिओ, प्रगत तंत्रज्ञान आणि विविध किंमत श्रेणींमध्ये वाढलेली उपलब्धता यांच्या जोरावर, बीएसएच भारतातील टॉप लोड वाशिंग मशीन सेगमेंटमधील पुढील वाढीच्या टप्प्यावर आक्रमकपणे भक्कम पकड निर्माण करण्यासाठी सज्ज आहे. भारतामधील बीएसएचच्या लॉन्ड्री व्यवसायाला मिळत असलेल्या मजबूत गतीच्या पार्श्वभूमीवर हा विस्तार करण्यात आला आहे. २०२६ च्या पहिल्या तिमाहीत, बॉश ने ऑटोमॅटिक टॉप लोड विभागात मागील वर्षाच्या तुलनेत दमदार दुहेरी अंकातील वाढ नोंदवली. याचबरोबर, सर्व विक्री चॅनेल्समधून मिळालेल्या मजबूत प्रतिसादामुळे एकूण लॉन्ड्री व्यवसायातही तब्बल ५० टक्क्यांची उल्लेखनीय वाढ नोंदवण्यात आली.

लॉंचच्या निमित्ताने बोलताना बीएसएच होम अप्लायन्सेसचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, सैफ खान म्हणाले, "भारतातील लॉंड्री श्रेणी वेगाने विकसित होत आहे आणि बीएसएच होम अप्लायन्सेस एक भक्कम आणि अधिक संतुलित पोर्टफोलिओसह या बदलाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज आहे. आमच्या टॉप लोड श्रेणीच्या विस्तारासह, आम्ही प्रीमियम बॉश तंत्रज्ञान विविध किंमतींच्या पर्यायांमध्ये उपलब्ध करून देत आहोत. याद्वारे आम्ही वेगाने वाढणाऱ्या टायर 2 आणि टायर 3 शहरांमधील ग्राहकांपर्यंत पोहोचत आहोत, जिथे सेमी-ऑटोमॅटिककडून फुली ऑटोमॅटिक मशीन्सकडे वळण्याचे प्रमाण वेगाने वाढत आहे." ते पुढे म्हणाले, "आमच्या 'मेक इन इंडिया, फॉर इंडिया या दृष्टिकोनावर आधारित ही श्रेणी आधुनिक भारतीय कुटुंबांसाठी तयार करण्यात आली आहे — जी बुद्धिमान, शक्तिशाली आणि उत्कृष्ट कामगिरी बजावणारी आहे. आमचे ध्येय स्पष्ट आहे: आमचे टॉप लोड वाशिंग मशीन व्हॉल्यूम तिप्पट करणे, आमचा मार्केट शेअर दुप्पट करणे आणि या श्रेणीमध्ये अव्वल स्थान मिळवणे."

# बियरच्या बाटलीने हल्ला; चौघांवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (दै. आरंभ पर्व)**




जेवण करत असलेल्या तरुणास जिवे ठार मारण्याची धमकी देऊन त्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून डोक्यात बिअरच्या बाटल्या फोडल्याची घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील सागर रेस्टॉरंट अँड बारमध्ये शनिवारी (ता.१६) रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास घडली आहे.

या घटनेत प्रसाद दिलीप शेंडगे (वय ३०, रा. कवडीपाट टोलनाका, कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे) हा जखमी झाला असून याप्रकरणी राज राजेंद्र पवार, सौरभ सुनील गायकवाड, राहुल संतोष गाडगे आणि १७ वर्षीय विधीसंघर्ष बालक (सर्व रा. कवडीपाट टोलनाका, कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे) यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शेंडगे हे सागर बार अँड रेस्टॉरंटमध्ये जेवण करत होते. त्यावेळी त्यांच्या मागील टेबलावर आरोपी बसले होते. अचानक त्यांनी "आमच्याकडे का पाहतो? आम्ही येथील भाई आहोत," असे म्हणत शेंडगे यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यानंतर चौघांनी शेजारील टेबलवरील बिअरच्या बाटल्या उचलून शेंडगे यांच्या डोक्यावर, छातीवर, नाकावर, कानावर आणि गळ्यावर वार करत त्यांना गंभीर जखमी केले. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी दगड फेकून मारत "तुझा मर्डर करून टाकतो," अशी धमकीही दिली. तसेच बाहेर उभ्या असलेल्या तुकाराम राजेंद्र कांबळे (रा. लडकत रोड, शिवनगर, मुंढवा, पुणे) यांनाही मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

जखमी प्रसाद शेंडगे यांच्यावर लोणी काळभोर येथील विश्वराज हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्यांच्या फिर्यादीवरून लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

गुन्हा दाखल होताच आरोपी फरार झाले असून, त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रुपाली जाधव करत आहेत.

# राष्ट्रीय डेंग्यू दिवस : भारतातील शहरे डेंग्यूची हॉटस्पॉट

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**



मान्सूनपूर्व प्रतिबंधात्मक उपक्रमांना सुरुवात करताना दरवर्षी १६ मे रोजी देशभरात राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा केला जातो. डेंग्यूला प्रतिबंध करण्यासाठी व्यक्ती, कुटुंबे आणि समुदाय या सर्वांकडून सातत्यपूर्ण प्रयत्नांची आवश्यकता असते, याचे हे एक स्मरण असते. यंदा वाढते तापमान आणि बदलत्या हवामनामुळे संपूर्ण भारतात डेंग्यूचा धोका अधिक आहे. त्यामुळे हे स्मरण पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाचे ठरते. भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) असा अंदाज वर्तवला आहे की, २०२६ मध्ये देशाच्या मोठ्या भागांमध्ये सामान्यपेक्षा जास्त तापमान आणि उष्णतेच्या लाटेचे अधिक दिवस अनुभवायला मिळतील. त्यामुळे हे वर्ष आतापर्यंतच्या सर्वात उष्ण वर्षांपैकी एक ठरण्याची शक्यता आहे. जगभरातील शास्त्रज्ञांनी असा इशाराही दिला आहे की एल निनोसारख्या हवामान पद्धतींमुळे तीव्र हवामान घटना अधिक घतक होऊ शकतात आणि रोगराईचा धोका वाढेल. अशा परिस्थितीमुळे डेंग्यूचा धोका वाढण्याची शक्यता आहे, कारण जास्त तापमानामुळे कीटकजन्य रोगांच्या प्रसारासाठी अनुकूल वातावरण निर्माण होते.

# वीज वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्याची गरज

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील सदाशिव पेठ परिसरात अलीकडे 25 तास वीज खंडित राहिली. ही समस्या एमएसईडीसीएलच्या एका युनिटमधील उपकरणांवर अतिउष्णतेचा परिणाम झाल्यामुळे निर्माण झाली. जास्त उष्णतेमुळे उपकरणे जास्त गरम झाली आणि महत्त्वाच्या भागांचे नुकसान झाले, ज्यामुळे आग लागली. या घटनेमुळे 5,500 पेक्षा जास्त ग्राहक प्रभावित झाले. तीव्र उष्णतेच्या लाटेत अनेक घरांमध्ये वीज नसल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. ही एकमेव घटना नाही. पुण्यातील वानवडी, शांतिनगर आणि जगताप चौक या भागांमध्ये अलीकडे फीडर दुरुस्तीसाठी सुमारे सहा तास नियोजित वीज खंडित करण्यात आली होती.

- वारंवार होणाऱ्या खंडित वीजपुरवठ्यामुळे व्यवस्थेतील त्रुटी समोर येत आहे

तसेच नागपूरमध्ये 873 मेगावॅटच्या विक्रमी मागणीमुळे वारंवार वीज ट्रिप होणे आणि दीर्घकाळ वीज खंडित राहण्याच्या घटना घडल्या. वीज पुरवठ्यातील अशा प्रकारच्या कपातीमुळे लोकांच्या दैनंदिन जीवन आणि व्यवसायांवर गंभीर परिणाम होत आहे.

वीज नसल्यामुळे हजारो नागरिकांना पंखे आणि एसीशिवाय तीव्र उष्णतेचा सामना करावा लागतो. तसेच रुग्णालयांना आवश्यक सेवा सुरू ठेवण्यात अडचणी येतात आणि लहान व्यवसायांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते.

# पिंपळाच्या पुनर्स्थापनेतून उभी राहिली 'ट्री आर्मी'

## सांगलीत हरित लोकचळवळीला मोठा प्रतिसाद




**अहिल्यानगर (दै. आरंभ पर्व)**

"कोणतेही पिंपळाचे झाड तोडू नये, त्याऐवजी त्याची पुनर्स्थापना करावी," या विचारातून सुरू झालेला उपक्रम आज हजारो सांगलीकरांच्या सहभागाने उभ्या राहिलेल्या 'ट्री आर्मी'पर्यंत पोहोचला असल्याचे मत आमदार सुहास बाबर यांनी व्यक्त केले. सांगली जिल्ह्यात सुरू असलेल्या या हरित लोकचळवळीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, पर्यावरण संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणावर लोक सहभागी होत आहेत.

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यात एका वेगळ्या प्रकारची हरित चळवळ उभी राहत असून, या उपक्रमाचे नेतृत्व आमदार सुहास बाबर करत आहेत. आडवाटेवर वाढलेल्या पिंपळाच्या झाडाची तोड न करता त्याचे पुनर्वसन करण्याच्या संकल्पनेतून या मोहिमेची सुरुवात झाली. आज या उपक्रमाचे रूपांतर हजारो नागरिकांच्या सहभागातून "ट्री आर्मी"मध्ये झाले आहे.

दिवंगत आमदार अनिलभाऊ बाबर हे मातीशी नाळ जोडलेले नेते म्हणून ओळखले जात होते. टेंभू योजनेचे जनक म्हणूनही त्यांचा उल्लेख केला जातो. त्यांच्या पश्चात राजकीय वारसा सांभाळणाऱ्या सुहास बाबर यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या ७८ हजार १७८ मताधिक्याइतकी झाडे मतदारसंघात लावण्याचा संकल्प केला असल्याचे सांगितले.

समाज माध्यमांवर "पिंपळाची गोष्ट" प्रसारित झाल्यानंतर या मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळाला. हजारो नागरिक स्वयंप्रेरणेने या चळवळीत सहभागी होत असून, जागा उपलब्ध करून देणे, पाणी, झाडे आणि श्रमदान अशा स्वरूपात मदत करत आहेत. "ट्री आर्मी" हे नावही नागरिकांनीच दिल्याचे बाबर यांनी सांगितले.

आपल्या मातोश्रींच्या श्राद्धदिनी ५ हजार ३०० आंब्यांची कलमे रुजवण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच विटा नगरपालिकेतील एका नगरसेवकाने चार वर्षांची वाढ झालेली ५२ झाडे भेट दिली, तर आळसंद ग्रामपंचायतीने ५०० झाडांचे रोपण केले असल्याचे त्यांनी नमूद केले.

सांगली जिल्हा प्रशासन आणि वन विभागाच्या माध्यमातून एका एकर जागेत जपानी पद्धतीचे "मियावकी जंगल" विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. गायरान जमिनीवर आणि रस्त्यालगत नैसर्गिकरित्या वाढणाऱ्या वृक्षांची लागवड करण्याचा उपक्रम सुरू असून, पूर्वी जिल्ह्यातील रस्त्यांवर असलेली हिरवी बोगदे पुन्हा निर्माण करण्याचे ध्येय असल्याचे बाबर यांनी सांगितले.

# हृदयासाठी ५ सुपरफूड्स : तुमची हृदयवाहिनी प्रणाली मजबूत ठेवा

**ऋतिका समद्दार**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



आजच्या वेगवान जीवनशैलीत शारीरिक हालचालींचा अभाव आणि प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांवर वाढती अवलंबित्व यामुळे उच्च कोलेस्टेरॉल, उच्च रक्तदाब आणि इतर हृदयविकारांच्या समस्या अधिक सामान्य होत आहेत. हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यासाठी योग्य पोषण महत्त्वाचे असून, बदाम, फॅटी फिश, हिरव्या पालेभाज्या, कडधान्ये आणि फळांसारखे पोषक तत्वांनी समृद्ध अन्न आहारात समाविष्ट केल्यास मोठा फायदा होऊ शकतो. ऋतिका समद्दार, मॅक्स हेल्थकेअरमधील प्रादेशिक प्रमुख – डायटेटिक्स, यांनी हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त अशा काही सर्वोत्तम खाद्यपदार्थांविषयी माहिती दिली आहे, जे हृदयविकाराचा धोका कमी करण्यास आणि दीर्घकालीन आरोग्य सुधारण्यास मदत करू शकतात.

कॅलिफोर्निया बदाम : दररोजच्या आहारात एक मूठभर बदामांचा समावेश करणे ही चांगली सुरुवात ठरू शकते, कारण ते पोषक तत्वांनी समृद्ध असून एक आरोग्यदायी सुपरफूड मानले जाते. बदामांमध्ये व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, प्रथिने, रिबोफ्लेविन, झिंक यांसह 15 आवश्यक पोषक घटक आढळतात. निरोगी आहाराचा भाग म्हणून कॅलिफोर्निया बदामांचा समावेश केल्यास एकूण आणि LDL कोलेस्टेरॉल कमी होण्यास मदत होते तसेच हृदयाला हानी पोहोचवणारी सूज कमी होऊ शकते. जर्नल ऑफ द अमेरिकन हार्ट असोसिएशन मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, दररोज 42 ग्रॅम बदामांचे सेवन केल्याने हृदयविकाराशी संबंधित अनेक जोखीम घटकांमध्ये सुधारणा झाली आणि HDL कोलेस्टेरॉलमध्येही लक्षणीय वाढ झाली.

मासे : दररोज किंवा साप्ताहिक आहारात फॅटी फिशचा समावेश करणे हे हृदयाचे आरोग्य सुधारण्यासाठी उत्तम मानले जाते, कारण त्यामध्ये ओमेगा-3 फॅटी ॲसिड्स आणि आवश्यक निरोगी फॅट्स मुबलक प्रमाणात असतात. हे घटक हृदयवाहिनी प्रणाली निरोगी ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. सॅल्मन, मॅकरल, सार्डिन, ट्युना आणि ट्राउट यांसारखे मासे सूज कमी करण्यास आणि रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. ओमेगा-3 फॅटी ॲसिड्स चांगले कोलेस्टेरॉल (HDL) वाढवतात, अनियमित हृदयस्पंदनाचा धोका कमी करतात आणि धमन्यांमध्ये प्लाक जमा होण्यापासून संरक्षण करतात.

हिरव्या पालेभाज्या : हिरव्या पालेभाज्यांमध्ये आवश्यक जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर आणि ॲंटिऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असतात, जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. पालक, केल आणि ब्रोकली यांसारख्या भाज्यांमध्ये व्हिटॅमिन K, नायट्रेट्स आणि फोलेट यांसारखे पोषक घटक असतात, जे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास, रक्ताभिसरण सुधारण्यास आणि एकूण हृदयवाहिनी कार्यक्षमतेला समर्थन देण्यास मदत करतात.

कडधान्ये : कडधान्ये ही कोणत्याही आहारातील हृदयासाठी उपयुक्त भर मानली जातात. त्यामध्ये वनस्पतीजन्य प्रथिने, फायबर आणि आवश्यक पोषक घटक भरपूर प्रमाणात असतात, तर चरबीचे प्रमाण कमी असते. मसूर, बीन्स, हरभरा आणि वाटाणा यांसारखे पदार्थ खराब कोलेस्टेरॉल (LDL) कमी करण्यास, रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास आणि रक्तदाब संतुलित ठेवण्यास मदत करतात. त्यातील जास्त प्रमाणातील फायबर पचन सुधारते आणि निरोगी वजन राखण्यास मदत करते, जे हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी महत्त्वाचे आहे.

फळे : ताजी फळे ही हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यासाठी नैसर्गिक आणि प्रभावी उपाय आहेत. त्यामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर आणि ॲंटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. बेरीज, संत्री, सफरचंद, केळी आणि डाळिंब यांसारखी फळे सूज कमी करण्यास, रक्ताभिसरण सुधारण्यास आणि रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. त्यातील नैसर्गिक ॲंटिऑक्सिडंट्स रक्तवाहिन्यांचे नुकसान होण्यापासून संरक्षण करतात आणि कालांतराने हृदयाशी संबंधित समस्यांचा धोका कमी करतात.

या हृदयासाठी उपयुक्त खाद्यपदार्थांचा रोजच्या जीवनात समावेश करणे हे उत्तम हृदय आरोग्याकडे जाणारे सोपे पण प्रभावी पाऊल आहे. प्रक्रिया केलेल्या अन्नाऐवजी पोषक तत्वांनी भरपूर अन्नाची निवड केल्यास कोलेस्टेरॉल, रक्तदाब आणि एकूण हृदय कार्यक्षमतेचे व्यवस्थापन करण्यात मोठा फरक पडू शकतो. आज हृदयाच्या आरोग्याला प्राधान्य दिल्यास भविष्यात अधिक निरोगी आणि सक्रिय जीवन जगता येऊ शकते.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.